# Level 2 -- Reading passages -- Exam 2015

पलंगावर मांजरीचे छोटेसे पिल्लू डोळे मिटून झोपले होते. त्याचे इवलेसे गच्च मिटलेले डोळे, पांढरे गुबगुबीत अंग, गुलाबी नाक मजेदार दिसत होते. मधूनच ते जांभाई देत होते. काही वेळा खात असल्यासारखे ओठ हलवित होते. ते बघून रिया व रुचाला हसू आले. रिया म्हणाली "खूप आळशी झाले आहे पिल्लू." त्यावर रुचा म्हणाली "होणारच. त्याला काय काम आहे? शाळेत थोडे जावे लागते? दूध प्या, उड्या मारा, इकडे तिकडे पळा, खेळा आणि झोपा. मजा आहे त्याची." दोघी हसल्या.

प्रश्न

१) मांजरीचे पिल्लू कुठे झोपले होते?

२) ते कसे दिसत होते?

३) दोन मुलींची नावे सांगा.

४) पिल्लू दररोज काय करत होते?

५) तुम्हाला मांजर / कुत्रा आवडतो का?

# Level 2 -- Reading passages -- Exam 2015

मनूच्या आईनं मनूला पोहायला शिकवायच ठरवल. एके दिवशी संध्याकाळी ती मनूला घेऊन पोहण्याच्या तलावावर गेली. मनूने बघितलं तर काय, एक मोठा चौकोनी तलाव होता. मोठ्या हौदासारखा. त्यातल पाणी निळं निळंशार दिसत होत. पाण्यात खूप माणसं पोहत होती. मुले काठावर उभे राहून पाण्यात उड्या मारत होती. मनून विचारल"आई हे पाणी असं निळं निळं का ग दिसतय?" आई म्हणाली"अग, त्या तलावाला खाली निळ्या फरशा लावल्यात ना, म्हणून पाणी निळं दिसतंय"

प्रश्न

१) आईने मनूला कुठे नेले?

२) मनूला तलाव कसा दिसला?

३) मुले काय करीत होती?

४) मनूला कशाची गंमत वाटली?

५) तलावातील पाणी निळे का दिसते?